केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय आयुष अभियान योजनेच्या अमलबजावणीस मुदतवाढ देण्याबाबत .

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः आयुष-२०१७/प्र.क्र.४७६/आ -७

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : २२ मार्च, २०१८.

वाचा :-

१) शासन निर्णय-आ/२०१४/४८३.क्र.प्र/३००११-साआवि.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र , २२ दिनांक ,७ जुन, २०१६.

२) संचालक (आयुष), आयुष संचालनालय ,मुंबई यांचे पत्र क्र. आसंमु/ राआअ ,२-आयु/२०१७/१८-२०१७/वाकृआ/केंपुयु/दिनांक २७ डिसेंबर, .२०१७

प्रस्तावना :-

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय / आयुष मंत्रालय, भारत सरकार यांनी १२ व्या पंचवार्षिक योजनेत AYUSH - Aayurveda, Yoga, Unani, Siddha & Homeopathy या पाच चिकित्सा पध्दतींवर भर देण्यासाठी राष्ट्रीय आयुष अभियानाची अंमलबजावणी सुरु केली आहे. राष्ट्रीय आयुष अभियानाचा मुळ उद्देश आयुष चिकित्सा प्रणालीस प्रोत्साहन देणे हा आहे. राष्ट्रीय आयुष अभियानामध्ये कमी खर्चात प्रभावी आयुष औषध उपचार, आयुष उपचार प्रणालीतील शक्ती स्थानांचा उपयोग करुन आयुष उपचार पध्दती महत्वाचा घटक बनविणे, आयुष शिक्षण प्रणालीचे बळकटीकरण, आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी व सिद्ध औषधाचे गुणवत्ता नियंत्रण करण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध करणे आणि औषधी तयार करण्यासाठी लागणाऱ्या वनस्पती व अन्य बाबी याची नियमित उपलब्धता यांचा समावेश आहे.

२. संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत कार्यान्वीत असलेल्या केंद्र पुरस्कृत योजनांना दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. दिनांक १ एप्रिल, २०१७ पासून जोपर्यंत केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय आयुष अभियान कार्यक्रम राबविण्यात येणार आहे, तो पर्यत सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या केंद्र शासन पुरस्कृत सर्व योजनांना मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत कार्यान्वीत असलेल्या केंद्र पुरस्कृत योजनांना दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. दिनांक १ एप्रिल, २०१७ पासून जोपर्यंत केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय आयुष अभियान कार्यक्रम राबविण्यात येणार आहे, तो पर्यत सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या केंद्र शासन पुरस्कृत सर्व योजनांना मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२११६१७१५८७१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amol Nilakanth Sakharkar

Digitally signed by Amol Nilakanth Sakharkar
DN: CN = Amol Nilakanth Sakharkar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Agriculture Animal Husbandry dairy and Fisheries Department
Date: 2018.04.04 15:59:00 +05'30'

(अ. नि. साखरकर)

अवर सचिव

प्रत,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन , मुंबई

२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा. मंत्री , वित्त व नियोजन, मंत्रालय, मुंबई

४. मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री, कृषी व फलोत्पादन, मंत्रालय, मुंबई
६. मा. मंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
७. मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय, मंत्रालय, मुंबई
८. मा. राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य, मंत्रालय, मुंबई
९. मा. संसद सदस्य (सर्व)
१०. मा. विधान सभा सदस्य / विधान परिषद सदस्य (सर्व)
११. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१२. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. आयुक्त (कुटुंब कल्याण) तथा संचालक, राष्ट्रीय आयुष अभियान, मुंबई
१६. अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई.
१७. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. प्रधान सचिव, कृषी व फलोत्पादन, कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. संचालक, आयुष विभाग, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय , नवी दिल्ली
२२. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
२३. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई
२४. व्यवस्थापकीय संचालक, राज्य औषधी वनस्पती मंडळ, पुणे
२५. तांत्रिक अधिकारी व परवाना प्राधिकारी ASU आणि होमिओपॅथी औषध परवाना प्राधिकरण, FDA, मुंबई
२६. महालेखापाल (लेखापरिक्षा) , महाराष्ट्र -१ मुंबई, महाराष्ट्र -२ नागपूर.
२७. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र -१ मुंबई, महाराष्ट्र -२ नागपूर.
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२९. कोषागार अधिकारी (सर्व जिल्हा)
३०. वरिष्ठ तांत्रिक अधिकारी (आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी, सिद्ध, योग आणि प्राकृतिक चिकित्सा आणि औषधी वनस्पती), मुंबई
३१. सह सचिव /उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३२. सह सचिव /उपसचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
३३. सह सचिव /उपसचिव (वने), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
३४. सह सचिव /उपसचिव, (फलोत्पादन), कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
३५. सह सचिव / उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्वीय सहायक (सर्व)
३६. उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ (सर्व)

३७. जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)

३८. जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)

३९. निवडनस्ती (आरोग्य-७)